नि.२१ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादीतर्फे अतिरिक्त वाद मुददे काढण्याकरिता करण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे असे की, सदर प्रकरणात मे. न्यायालयाने वाद मुददे काढलेले आहेत परंतु सदर वाद मुददे अपुर्ण असुन सदर दाव्यात न्यायाच्या दृष्टीने अतिरिक्त वाद मुददे काढणे आवश्यक आहे. तरी खालील वाद मुददे काढावे अशी विनंती केली आहे.

1- Whether Plaintiff is entitle for filling suit?

2- Whether suit is bad for not mentioned suit property in suit?

त्यासाठी प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे दिले की, प्रस्तुतचा अर्ज हा कायदयानुसार दिलेला नाही व तो रदद होण्यास पात्र आहे. तसेच सदर प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतमध्ये दावा मिळकती संदर्भातील काही मिळकती दाखल केलेल्या नाहीत अथवा वादीस दावा दाखल करण्याचा अधिकार नाही या संदर्भात कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे सदर कारणामुळे या प्रकरणात अतिरिक्त वाद मुददे काढण्याची परवनागी न देता सदर अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

४. अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सदरचे प्रकरण हे वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द वसुलीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादीने नमुद केलेले वाद मुददे ध्यानात घेता हे नमुद करणे जरुरीचे की, प्रतिवादींनी नि.क्र १५ प्रमाणे कैफियत दाखल केलेली आहे. सदर कैफियतमध्ये प्रतिवादींनी वादीस दावा चालविण्याचा अधिकार नाही अथवा वादीने इतर आवश्यक मिळकती दाव्यामध्ये सामील केलेल्या नाहीत याबाबतचे कोणतेही कथन केलेले नाही. अशा परिस्थितीत वाद मुददे म्हणजे काय हे जाणुन घेणे जरुरीचे आहे. वाद मुददे म्हणजे एक पक्षकार एखादे तथ्य होकारार्थी सांगत असेले व दुसरे पक्ष ते नाकारत असेल तर त्यास वाद मुददे असे म्हणले जाते. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादींनी त्याच्या

कैफियतमध्ये कोठेही वादीस दावा चालविण्याचा अधिकार आहे व आवश्यक मिळकती दाव्यामध्ये सामील केलेल्या नाहीत हे नाकारलेले नाही अथवा तसे नमुद देखील केले नाही. त्यामुळे प्रतिवादीचे या अर्जातील नमुद वाद मुदयासंदर्भात कैफियतमध्ये कोणतेही नसताना सदर वाद मुददे काढणे न्यायोचित होणार नाही.

५. याठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ५ प्रमाणे अतिरिक्त वाद मुददे काढता येतात जेव्हा ते प्रकरणातील वादातील मुददा निर्णायक करण्याकरीता जरुरीचा असतो. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सदर अतिरिक्त वाद मुददे हे वादातील मुददा नाही. त्यामुळे सदर अतिरिक्त वाद मुददे काढता येणार नाही. त्यामुळे न्यायाचे हित ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणे उचित होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला

आदेश

अर्ज (नि.२१) नामंजूर करण्यात आला.

(ह.उ.उ.पाटील)

दिनांक : ०२/०७/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, भोर जि.पुणे.

## Certificate

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.
Name of the Steno :
Court Name : H.U.U. Patil
Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.
Date : 02/07/2022
Order signed by presiding officer on : 2/07/2022
Order uploaded on :04/07/2022.